२८३१४

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन, सहावा मजला,
नवी मुंबई - 400 614.
दिनांक : 14 NOV 2002

**कार्यालयीन आदेश क्रमांक : 30 दिनांक :**

**विषय:- वार्षिक लेखे तपासणी बाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक स्था.18/ब/सभा/एएसए/1247
दिनांक 29/10/2002.

दिनांक 18/9/2002 रोजी कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित केलेल्या स्थानिक निधी लेखा च्या विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांच्या बैठकीत जिल्हा परिषद वार्षिक लेख्यांबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

1. औरंगाबाद आणि नागपूर विभागातील सन 1999-2000 चे प्रलंबित जिल्हा परिषद वार्षिक लेखे लवकरात लवकर शासनास सादर होण्याच्या दृष्टीने विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांनी आवश्यक तो पाठपुरावा करावा.
2. सन 2000-2001 चे प्रलंबित वार्षिक लेखे लवकरात लवकर शासनास सादर होती यादृष्टीने आवश्यक तो पाठपुरावा विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक व जिल्हास्तरीय उपमुख्य लेखा परीक्षक यांनी करावा.
3. वार्षिक लेखे तपासणीसाठी प्राप्त झाल्यानंतर त्यात एकदाच त्रुटी काढण्यात याव्यात. वारंवार त्रुटी काढून विनाकारण वार्षिक लेख्यांना विलंब करु नये.
4. वार्षिक लेखे तपासणीसाठी प्राप्त झालेनंतर आपल्या स्तरावर ते जास्त काळ प्रलंबित ठेवू नयेत. तपासणी करुन ते त्वरीत संबंधीतांना परत करावेत.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
नवी मुंबई.

माहितीस्तव व पुढील कार्यवाही साठी अग्रेषित.
1. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा.
2. उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,
3. उपमुख्य लेखा परीक्षक (अहवाल/पं.रा.स./प्रशासन)
4. लेखा परीक्षा अधिकारी (प.रा.स./कृषि विद्यापीठे)
5. सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी (अहवाल/प.रा.स.)
6. सहाय्यक अधिक्षक, अहवाल शाखा
7. उच्चस्तर लिपिक 1/2/3/4
8. अभिलेखापाल (2 प्रती)